
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 10 | JUNE - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL



# "छत्रपति शिवाजी महाराज यांचे शिक्षणविषयक धोरण"

प्रा.डॉ. व्ही.जी.वसु
डॉ.एच.एन.सिन्हा महाविद्यालय
पातूर जि.अकोला.

१७व्या शतकात मराठयांची वतनाची आसक्ती जबरदस्त होती. त्यामुळे लोक पराक्रमास प्रवृत्त झाले. सर्व वर्गातील लोकांनी रणांगणावर तलवार गाजविली. त्याचा यथोचीत गौरव शिवरायांनी केला. मावळयांनी शिवरायांना स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवण्यास मदत केली. मऱ्हाष्ट्रराज्य स्थापण्याचे कार्य शिवाजीमहाराजांनी केले. त्यामुळे जनतेची दृष्टीच बदलली व महाराष्ट्रात नवयुग अवतरले. शेतकऱ्यांच्या जमिनीवरील प्रेमामुळे तत्कालीन समाज स्थितीशील बनला होता. व्यापारही मार्यादित होता. दळणवळणाचे रस्ते खराब, मोठे रस्ते कमी होते, बैलगाडी व घोडयाचा वहातुकीसाठी उपयोग होत असे. समाजातील नैतिक मुल्यांची घसरण थांबविण्याचा प्रयत्न तत्कालीन संतांनी केला. समाजात चालीरितींची परंपरा होती. समाजाचा नैतिक पाठींबा मिळविण्यासाठी शिवरायांना दोन वेळेस राज्याभिषक करावा लागला. अशाकाळात, स्वराज्य संस्थापकाचा स्वराज्यात शिक्षणविषयक दृष्टीकोन कसा होता हे पहाण्यापुर्वी शहाजीराजे व शिवराय यांच्या शिक्षणाबाबत माहिती पहाणे उदबोधक आवश्यक ठरेल.

## शहाजीराजांना विद्येची आवड :-

आपल्या पुर्व पंरपरेची, प्राचीन संस्कृतीची व संस्कृत भाषेची आवड शहाजीराजांना होती. ते विद्या-कलांचे भोक्ते होते. भोसले घराण्याने संस्कृत भाषेच्या विकासात महत्वपुर्ण भूमिकापार पाडली. शहाजीराजांचा दासीपुत्र कोयाजी व शिवरायांचे सावत्र बधु व्यंकोजी यांनाही संस्कृत भाषेची आवड होती. तंजावरच्या राज्यातही विद्येची आवड दिवसेनदिवस वाढतच गेलेली दिसते. तेथील सरस्वती महाल ग्रंथालयात हजारो ग्रंथ पहावयास मिळतात. यामागे शहाजीराजांच्या ठिकाणी असणारी प्राचीन संस्कृतीची आवड दिसून येते.

स्वत: शहाजी राजे विव्दान असून जयराम पिंडे, मकरंदकार देव इ.३० विव्दान त्यांच्या पदरी होते. शिवाय त्यांना संस्कृत, फारशी व कानडी भाषेचे ज्ञान होते. एकंदरीत शहाजीराजे स्वत: सुसंस्कृत असल्याने शिवरायांच्या शिक्षणाकडे त्यांनी जाणिवपूर्वक लक्ष दीलेले दिसते.

## छ.शिवाजी महाराजांचे शिक्षण :-

मातोश्री जिजाबाईना रामायण व महाभारत या जुन्या ग्रंथाचे श्रवण करून प्रगल्भता लाभली होती. त्यांनी शिवरायांच्या शिक्षणाची जबाबदारी पूर्णपणे पारपाडलेली दिसते.

शिवाजी महाराजांचे हस्ताक्षर फारसे उपलब्ध नाही. परंतु काही पत्रावरील "वहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा." अशाप्रकारचे त्यांचे हस्ताक्षर प्रसिध्द आहे. शिवरायांचे सर्व आयुष्यच धामधुमित गेले. राज्यस्थापनेनंतर दप्तर तयार झाले. परंतु रायगड इ.स. १६८९ ला मोगलांच्या हाती गेल्याने ते नष्ट झाल्यामुळे शिवरायांचे हस्ताक्षर दुर्मिळ झाले.

बंगलोर येथील १६४०-४२या दोन वर्षाच्या वास्तव्यात शहाजीराजांनी शिवरायांना सर्व प्रकारचे प्रशिक्षण दिले. विविध विव्दानांचे सानिध्य लाभल्याने युध्द व राज्यकारभार करण्याचे धडे मिळाले. इ.स. १६४२मध्येपुण्यात आल्यानंतर मल्लविद्या, तलवार व दांडपट्टा चालविणे, घोडयावर बसणे, कारभार पहाणे याबाबतचे शिक्षण मिळाले. शिवाजीराजांना

अनेक परभाषा बोलता येत असत रियासतकारांनी उल्लेख केला आहे. शिवरायांच्या काळात भीमजी परेख यांनी इंग्लंडमधून एक छपाई यंत्र व कारागीर आणण्याचा प्रयत्न केला होता, पण प्रकाशनाच्या कामी त्याचा कोणी उपयोग केल्याचे दिसत नाही. खुद्द शिवरायांनीही छापलेले कागद पाहिले असण्याचा संभव आहे:कारण त्यांचा पोर्तुगीज व इंग्रजांशी बराच संबंध येई.

कृष्णा ज्योतिषी, कवी परमानंद, कवी भूषण, केशव भट्ट हे विव्दान शिवरायांच्या पदरी होते. ब्राम्हण विव्दानांना धान्य, कपडे व पैशाच्या स्वरूपात मदत दिल्या जात असे. शहाजी राजे व जिजाबाईने शिवरायांच्या शिक्षणाची व्यवस्था करतांना राजपुत्राचे व राज्यकर्त्या घराण्यातील मुलाचे शिक्षण हा दृष्टीकोन समोर ठेवलेला दिसतो. तीच दृष्टी आपल्या मुलांच्याबाबत शिवरायांनी ठेवलेली दिसते. या सर्व चर्चेवरून ग्रँडडफ्ने शिवराजांवर केलेला निरक्षरतेचा आरोपाचे खंडण होते.

## शिवाजी महाराजांचा राजपुत्रांच्या शिक्षणविषयक दृष्टीकोन :-

संभाजी व राजाराम यांच्या शिक्षणाकडे शिवरायांनी विशेक्ष लक्ष दिले त्यावरून त्यांचे राजपुत्रांचे शिक्षणविषयक दृष्टीकोन स्पष्ट होतो.

इ.स. १६७०मध्ये संभाजीराजास १३वे वर्ष सुरू झाले तेंव्हा शिवरायांनी त्यांना विद्या, कला, प्रशासन, युध्दनिती व राजनीतीचे प्रशिक्षण देण्यास आरंभ केला. संभाजीराजांना धनुर्विद्या, संगीत, रामायण, पुराणेतिहास व काव्यालंकार शिकविण्यासाठी केशव पंडीताची नेमणूक केली. यावर्षी शिवरायांनी संभाजीराजांवर राज्यकारभाराची जबाबदारी सोपविली. संभाजीस लिहीण्यासाठी कागद, शाई व मदतनीस देण्यास शिवरायांनी १९-९-१६७१ यादिवशी धारराव निंबाळकरांना पत्र लिहिले. होते. संभाजीराजे संस्कृत व हिंदी भाषेचे अभ्यासक होते. अनेक विव्दान त्यांच्या पदरी होते. केशव पंडीत, गंगाभट्ट, कवी महेशदास कविकलश हे त्यापैकी कांहीजण. मथुरेस काशी पंडिताच्या घरी त्यांनी ज्ञान संपादन केले होते. त्यांना हिंदी कवने करण्याचा नाद होता. नखशिखा व नायिका भेद ही दोन हिंदी काव्ये संभाजीराजांनी लिहीली. संस्कृत भाषेचे ज्ञान संभाजीराजांना असल्याचे इ.स. १६७७मध्ये त्यांनी लिहिलेल्या बुध-भुषण या ग्रंथावरून दिसते. इ.स. १६७७-७८मध्ये संभाजीराजे शृंगारपूरला असतांना केशव पंडिताने त्यांना दंडनीती शिकवून रामायण ऐकविल्याचे राजाराम चरित्रामधून वर्णन पहावयास मिळते. शिवरायांसारखेच संभाजीचेही जीवन साहसात व धामधुमीत गेले. शिवरायांनी त्यांना योग्य शिक्षण देण्याची तरतुद केली होती. उमाजीतमपंडित व केशव भट्ट या शिक्षकांनी त्यांना शिकविण्यासाठी नेमणूक केल्याचे दिसते. शिवाय जिजाबाईचेही युवराजांकडे लक्ष होतेच.

राजारामाची बालपणाची दाहावर्षे घरातच गेली असल्याने शिवरायांच्या हयातीत कदाचित एखादा पुराणिक त्यास पुराण किंवा गोष्टी सांगत असावा. इ.स. १६८९च्या ५ एप्रीलमध्ये रायगडाच्या पाडावानंतर राजारामाने पन्हाळा मुक्कामावरून मराठा किल्लेदारांना गोगलांचा । पाडाव करण्याचा आदेश देणारी आपल्या सहीची पत्रे पाठविल्याचा उल्लेख मिळतो. त्यावरुन राजारामास लिहीता-वाचता येत होते हे स्पष्ट होते.

## सामान्य लोकांच्या शिक्षणाविषयी दृष्टीकोन :-

सामान्य लोकांच्या शिक्षणाविषयी शैक्षणिक धोरण आजच्यासारखे नव्हते. तत्कालीन हिंदू व मुसलमानांच्या पाठशाळामधून सामान्यांना शिक्षण मिळावे असे त्यांचे धोरण असावे. तुकाराम व रामदास या संतांच्या ग्रंथातून बालबोध अक्षर "घडसोनि करावे सुंदर" आणि "हिसाब किताब ठेवण" यावरून सामान्य जनतेच्या शिक्षणाबद्दल किरकोळ माहिती मिळते. सामान्यांच्या दृष्टीने शिवरायांनी राज्य व्यवहारकोषाची निर्मीती करून मराठी व संस्कृत भाषेला महत्व प्राप्त करून दिले. स्वराज्याच्या वाढत्या सीमेबरोबरच मराठी भाषेची सीमाही वाढली. मराठेशाहीतील ऐतिहासिक गद्य हा मराठीचा एक बहुमोल अलंकार असून तयाची निर्मीती शिवरायांनीच केली.

शिक्षणात बहुतेक विद्यार्थी आपापल्या व्यवसायाकडे लक्ष देत. वाचन, मनन व लेखन यावर भर असे. ब्राम्हण हा धर्मोपाध्याय, किर्तन, प्रवचनकार, दरबारी मुत्सद्दी, कारकून, शिक्षक, वैद्य इत्यादी व्यवसायात असे. मराठे क्षत्रिय जहागिरदार लढाईच्या पेशा व शिकार करित शेतकरी, गावातील सुतार, लोहार, शिंपी असे असत. काही वशंपरंपरागत व्यवसाय व स्वत:ची लहानशी जमिन असे. प्रत्येकास आपापल्या क्षेत्रापुरते कसब दाखवावे लागे. विद्येची व बुध्दीची आणि कारागीराच्या हस्तकौशल्याची कधीच गाठ पडली नसल्याने ज्ञान व हस्तकौशल्य यांना मर्यादा पडल्या. ही सामाजिक पंरपरानिष्ठ वृत्ती प्रगतीस बाधक ठरली. शिवरायांच्या वेळचा समाज अनेक विषय हाताळण्यास सज्ज होता. "शिवरायांप्रमाणेच त्यांच्या प्रधानास व साहयकर्त्यांना विशिष्ट शिक्षण मिळाले नसताही, ते आपापली कामे करण्यास लायक व समर्थ झाले, याचे कारण ते जगाच्या प्रत्क्षानुभवांत तरबेज ाेऊन बाहेर पडले होते. असे स्पष्ट दिसते.

### महाराजांचा स्त्री शिक्षणविषयक दृष्टीकोन :-

शिवकाळात स्त्रीयांना शिक्षणापासून अलिप्त ठेवल्या गेले. बालविवाहाने त्यात भर पडली. स्त्रीयांनी शिकू नये असाच लोकांचा समज दृढ झाला होता. राजघराण्यातील काही स्त्रियांना युध्दकला, घोडयावर बसणे व प्रशासनाचे शिक्षण मिळत असे. जिजाबाई, येसूबाई व ताराबाई यांचा राज्यकारभारात नावलौकीक होता.

### सर्वसाधारण शिक्षण :-

या शिक्षणापासून तीन प्रकारचे शिक्षण दिले जातसे. (१) लष्करी शिक्षणात मल्लविद्या, युध्दोपयोगी शिक्षण व विविध हत्यारे यांचा उपयोग करणे, दांड-पट्टा, भाला-तलवार, बाण व बंदुक हे लष्करी स्वरूपाचे शिक्षण असे. (२) वाणी, व्यापारी, सोनार, सुतार लोहार, यांना आपापले व्यवहार पाहण्यासाठी व्यवहारोपयोगी शिक्षणाची गरज होती. (३) ब्राम्हण मुलांना बालबोध, मोडी, उजळणी मुंजीनंतर संध्या, पुरूषसुक्त, रामरक्षा, पुजापाठ, मंत्र वगैरे धार्मिक स्वरूपाचे शिक्षण दिल्या जातसे.

### मूल्यमापन :-

शिवकाळात शिक्षणावर सरकारी तिजोरीतून योग्य तया प्रमाणात खर्च केला जात असे. ज्या मठांना व मंदिरांना सरकारतर्फे देणग्या मिळत तेथे थोडयाफार प्रमाणात लोकांना धार्मिक शिक्षण मिळावे अशी शिवरायांची अपेक्षा होती. पंडितराव या मंत्र्याकडे धार्मिक व शिक्षणक्षेत्रही दिलेले होते. दक्षिणा म्हणून जी संस्था पुढे पेशवाईत प्रसिध्दीस आली तिचे जनक शिवाजीराजे होत. परीक्षा घेवून द्रव्यव्दारा विव्दानास बक्षिस देणे हे या संस्थेचे कार्य होते. शिवरायांचा काळ हा धामधुमित गेल्याने त्यांना शैक्षणिक विकासाकडे फारसे लक्ष देता आले नाही. याबाबत रियासतकार सरदेसाई म्हणतात, "अशा कामी राज्यकर्त्यास दिशा दाखवून देण्याचे काम विव्दान व विचारवंताचे असते. प्रथम विव्दान लोक नवीन दिशा दाखवीतात आणि मग त्या कामास राजाश्रय मिळतो. एकंदरीत शिवरायांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन हा संस्कृती व मुल्यरक्षणावर भर देणारा होता असे दिसून येते.

### संदर्भ सूची :-

१) आठवले सदाशिव - मराठी सत्तेचा विकास आणि ऱ्हास
२) कूळकर्णी अ.रा. - अशी होती शिवशाही
३) खोबरेकर वि.गो. - मराठयांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम
४) देशपांडे प्र.न. - मराठयांचा उदय आणी उत्कर्ष
५) पवार जगयसिगराव - मराठी सत्तेचा उदय
६) बेंन्द्रे वा.सि. - छत्रपति संभाजी महाराज. यांचे चरित्र.
७) पवार जयसिंगराव - मराठेशाहीचा मागोवा.
८) पवार जयसिंगराव - छत्रपति संभाजी स्मारक ग्रंथ
९) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत खंड १